# शहीद दिन

## भगतसिंग : ( दि.२८ सप्टेंबर, १९०७ - २३ मार्च, १९३१)

## (अल्प परिचय)

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक थोर सशस्त्र क्रांतीकारक. पंजाबमधील (विद्यमान पाकिस्तान) बंगा (जिल्हा ल्यालपूर) या गावी एका शेतकरी-देशभक्त शीख कुटुंबात जन्म. आईचे नांव विद्यावती व वडीलांचे नांव किशनसिंग. किशनसिंग, लाला लजपतराय यांच्याबरोबर मंडालेच्या तुरुंगात होते. त्यांना क्रांतीकारी वाङ्मयाचा प्रसार केल्याबद्दल १० महिन्यांची शिक्षा झाली (१९०९). प्राथमिक शिक्षण बंगा येथे घेऊन भगतसिंग लाहोरच्या डी. ए. व्ही. व पुढे नॅशनल कॉलेजमधून बी. ए. झाले (१९२३). विद्यार्थिदशेत जयचंद विद्यालंकार व भाई परमानंद या शिक्षकांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला. डी. ए. व्ही. कॉलेजमध्ये असतानाच त्यांनी विद्यार्थ्यांची संघटना उभारण्यात पुढाकार घेतला आणि आजन्म अविवाहित राहून स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्याची शपथ घेतली.

सन १९२३ मध्ये “सोशॅलिस्ट रिपब्लिकन अॅसोसिएशन” या संस्थेत ते दाखल झाले. त्यांची लवकरच मध्यवर्ती समितीचा सचिव म्हणून नियुक्ती झाली. संघटितरीत्या कार्य करणाऱ्या सुखदेव, चंद्रशेखर आझाद, बटुकेश्वर दत्त, भगवती चरण, जतींद्रनाथ दास वगैरेंचे सहकार्य त्यांनी घेतले व “नवजवान भारत सभा” ही कट्टर देशभक्त युवकांची संघटना स्थापन केली (१९२५). या संघटनेची शाखा लाहोरला स्थापून तिचे नेतृत्वही त्यांनी केले. चंद्रशेखर आझाद, बटुकेश्वर दत्त, जतींद्रनाथ दास इत्यादींच्या मदतीने त्यांनी विविध क्रांतिकारक योजना आखल्या. काकोरी खटल्यातील बंदींची तुरंगातून सुटका करणे, सायमन आयोग व त्याच्या शिफारशी याविरुद्ध तीव्र निषेध नोंदविणे, शस्त्रे जमा करणे, महत्त्वाच्या केंद्रांत बॉंब कारखाने चालू करणे, लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा सूड घेणे इ. कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेतला.

क्रांतिकारक पक्षाने दोन अन्यायकारक विधेयकांचा (ट्रेड डिस्प्युट बिल व पब्लिक सेफ्टी बिल) निषेध म्हणून दिल्लीच्या केंद्रीय विधानसभेत (ब्रिटिशांच्या हुकूमशाही वृत्तीचा निषेध करण्यासाठी) बॉंब टाकण्याचे काम बटुकेश्वर दत्त व भगतसिंग यांच्याकडे सोपविले. ८ एप्रिल १९२९ रोजी प्रेक्षक सज्जातून बटुकेश्वर दत्त व भगतसिंग यांनी सभागृहात बॉंब फेकले, हवेत गोळ्या झाडल्या व निषेधपत्रके फेकली. पुढे दोघेही “इन्किलाब जिंदाबाद” अशा घोषणा देत सरकारच्या स्वाधीन झाले. खास न्यायाधिकरणाने त्यांना फाशीची शिक्षा सुनावली (दि.७ ऑक्टोबर १९३०). या शिक्षेची अंमलबजावणी शिवराम हरी राजगुरू व सुखदेव यांना दिलेल्या फाशीच्या शिक्षेबरोबर लाहोरमधील मध्यवर्ती तुरंगात दिनांक २३ मार्च १९३१ रोजी करण्यात आली.

****

स्रोत: सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ